Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकसंख्या विषयक धोरण

**प्रा. डॉ .कालिदास सूर्यवंशी**
इतिहास विभाग प्रमुख,
बद्रीनारायण बारवाले महाविद्‍यालय, जालना.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे झाली आपण 21व्या शतकात प्रवेश केला. स्वातंत्र्याच्या 75 वर्षात शेती, उद्‍योग, तंत्रज्ञान आणि शिक्षण या क्षेत्रामध्ये आपण आजही मागे आहोत. आज जवळपास 35 ते 40 टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली आहे. 30 कोटी लोकांना वाचता येत नाही. आर्थिक आणि सामाजिक विषमतेची दरी सतत वाढत आहे. पर्यावरणाचा नाश होत आहे. मानव जातीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. लोकसंख्या वाढ त्यामागील मुख्य कारण आहे. आपला देश स्वतंत्र झाला त्यावेळी आपल्या देशाची लोकसंख्या 35 कोटी होती. आज ती 120 कोटी च्या पुढे गेली आहे. भारतातील कुटुंब नियोजन आणि लोकसंख्या नियंत्रण ज्या पद्धतीने चालू आहे त्या पद्धतीने ते चालू राहिल्यास भारताची लोकसंख्या सन 2050 च्या सुमारास स्थिरावेल आणि त्यावेळेस आपली लोकसंख्या 160 ते 170 कोटीच्या घरात गेलेली असेल असे अनुमान कित्येक शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे.

लोकसंख्या वाढीमुळे देशाने केलेल्या प्रगतीचे फळे गोरगरीब जनतेच्या पदरात पडू शकली नाहीत. भविष्यात आपली लोकसंख्या 170 कोटी झाली तर अन्नधान्य, निवारा, वस्त्र, शिक्षण, नोकरी आणि पिण्याचे पाणी लोकांना पुरविणे अशक्य होईल पाण्यासाठी आणि अन्नासाठी जागोजागी दंगली होतील आणि लोकांचे मुद्दे पाडले जातील अशा या गंभीर समस्येचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी 80-85 वर्षांपूर्वी म्हणजेच 1938 साली केला आणि त्यावर उपाय सुचविले.

मुंबई कायदे मंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. 10 नोव्हेंबर 1938 रोजी संतती नियमना विषयी एक अशासकीय ठराव मांडला होता.[1] अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सभागृहात उपस्थित राहण्यास वेळ मिळाला नसल्यामुळे तो ठराव श्री प्रभाकर रोहम यांनी मांडला तो मूळ ठराव खालील प्रमाणे होता.

“This Assemble recommends to Government should carry on an intensive propaganda in favour of birth control among the masses of this province and should provide adequate facilities for the practice of birth control.” [2]

ठरावाच्या समर्थनार्थ केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जे भाषण प्रभाकर रोहम यांनी सभागृहात सादर केले शिकलेल्या वर्गात संतती संतती नियमनाची आवश्यकता कळली आहे.[3]

नेताजी सुभाषचंद्र एकावेळी भाषणात म्हणाले होते नजीकच्या भविष्यकाळात जर आपल्या देशाची लोकसंख्या झपाट्याने वाढत राहिली तर आपल्या सर्व योजना धोक्यात येण्याचा संभव आहे. एवढेच काय महात्मा गांधींनी सुद्धा लिहिले आहे की या भूमीवर नवीन जन्माला येणाऱ्या बालकाच्या संख्येबाबत ऐकल्यावर मला होणारा खेद मी वाचकापासून लपविता कामा नये शारीरिक मानसिक किंवा आर्थिकदृष्ट्या अपंग अथवा दुर्बल माणसांनी जन्माला घातलेल्या अपत्यांना अमर्याद नुकसान सहन करावे लागते याची पुरेशी जाणीव फारच थोड्यांना आहे. [4]

नुसत्या पालकांनाच नव्हे तर समाजाला देखील बराच त्रास होतो अशा प्रकारे मुलाचे जन्मच टाळता आले तर परत परत मुले होणे व त्यामुळे होणाऱ्या रोगांना बळी पडणाऱ्या स्त्रियांचे मृत्यू प्रमाण बरेच घटेल, बालमृत्यू थांबतील, सार्वजनिक आरोग्य सुधारेल, गुन्हे कमी घडतील आणि व्यक्तीच्या आध्यात्मिक प्रगतीला वाव मिळवून समाजाची प्रगती होईल. [5]

चालू काळातील स्पर्धात्मक जीवनामुळे वेळेला लग्न होणे अवघड झाले आहे त्यामुळे अनेकांना अनेक प्रकारच्या रोगांना वाईट सवयींचे बळी व्हावे लागते ज्यादा मुलांना जन्म देणाऱ्या मातांना जीवनाला मुकावे लागते नको असलेले मुले टाळण्यासाठी महिला गर्भपाता सारखे धोकादायक उपाय करतात. नको असलेल्या मुलाकडे ते दुर्लक्ष करतात त्यामुळे समाजाचे वरचेवर अंधपतन होत जाते या सर्व प्रश्नाचे उत्तर म्हणजे लोकसंख्या नियंत्रण होय. एखाद्या स्त्रीला मुल नको असेल तर तिला गर्भधारणा टाळता आली पाहिजे आणि मुलांना जन्म देणे हे सर्वश्री तिच्या मनावर अवलंबून असले पाहिजे. [6]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात डॉ. रोनाल्डर यांनी 1933 साली व्ही.एम. सभेपुढे वाचलेल्या निर्बंधातील उतारा देतात तो उतारा असा आहे अनैतिकतेचे मूळ कारण दारिद्र्य हे आहे जर्मनीमध्ये प्रत्येक कुटुंबास एक खोली, फ्रान्समध्ये अडीच खोल्या तर ब्रिटनमध्ये तीन खोल्या 1925 मध्ये बर्लिन शहरात 75 हजार कुटुंबांना स्वतःचे निवासस्थान नव्हते त्यामुळे त्या कुटुंबातील मुले आई-वडिलांबरोबर एकाच खोलीत नव्हे तर एकाच अंतुरनात झोपत. [7]

वाईट आरोग्यामुळे आणि गर्दीत राहिल्यामुळे अनेक मुलं मरण पावतात. अनेक कुटुंबे गुप्त रोगाचे शिकार बनतात, अनेक मुलांना शारीरिक विकास होण्यापूर्वी लैंगिक समागमास बळी पडावे लागते. मुले चोऱ्या करतील तर मुली वेश्या बनत. अशीच स्थिती व्ही.एम. शहरात होती लहान शहरे आणि ग्रामीण भागात फार वाईट अवस्था होती. [8]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असेही सांगितले की मुंबईसारख्या शहरातही व्ही.एम. सारखी अवस्था आहे. ते म्हणाले की दारिद्र्यामुळे सद्गुणही दुबळे ठरतात, लटके पडतात आणि लोकसंख्या नियंत्रणा शिवाय दारिद्र्याचे निर्मूलन शक्य नाही. भुकेल्याच्या हातून कोणते पाप घडणार नाही. जेव्हा आपल्या लक्षात येईल की संतती नियमन हे अत्यावश्यक आहे. ते साध्य करण्यासाठी उपायाचा आणि साधनाचा अत्यंत गंभीरपणे विचार केला पाहिजे. [9]

बाबासाहेबांनी पुढे असेही सांगितले की संतती नियमन करण्यासाठी दोन मार्ग आहेत असे सांगितले त्यापैकी एक मार्ग म्हणजे लैंगिक सुखाने समाधान पावणे संतती झाल्यावर मनातून लैंगिकतेचा विचार काढून टाकणे आणि आधुनिक संतती प्रबंधानाचा वापर म्हणजे हा दुसरा मार्ग आहे पहिल्या मार्गाबद्दल जे म्हणाले की मोहाला सहजपणे बळी पडणाऱ्या लोकांची संख्या जास्त असते म्हणून त्यांनी नाकारले आणि सांगितले की आत्मनिमानाचा मार्ग निरर्थक होय केवळ आत्म संयमाने सर्व सामान्य लोक संतती नियमन करू शकतील, होणाऱ्या मुलाचा जन्म टाळू शकतील हे अगदी अशक्य आहे. लोकांनी संतती नियमनावर अवलंबून राहिले पाहिजे. यावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला. [10]

लोकांनी संतती प्रतिबंध काचे महत्व नाकारणे म्हणजे गर्भपात, बालहत्या इत्यादींनी मान्यता देणे होईल असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी स्वतःच्या संतती प्रतिबंधक ठरावाला पाठिंबा देणारे ते भाषण केले त्यात असेही सांगितले की पाश्चात्य जगातील सर्व पंथातील लोक आधुनिक गर्भ प्रतिबंधकाचा वापर करतात.

संतती नियमनामुळे आपण संख्येने कमी होऊ व इतर आपल्यापेक्षा वरचढ ठरतील हे भीती आणा ठाई आहे. लोकसंख्येचा दबावामुळे निर्माण झालेल्या आर्थिक समस्यांचं युद्धांना कारणीभूत ठरतात जर्मन लोकांनी लोकसंख्या वाढीचा जो हट्ट युद्धाच्या पूर्वी धरला होता त्यामुळे सर्व लोकांना भाकरी देण्याची समस्या देशाच्या सर्व राजकीय तसेच आर्थिक विचारांना व कृतींना तीव्रछेद देत राहिली लोकसंख्या पासून सुटका मिळविण्याचा एक मार्ग म्हणून स्थलांतर करण्याचा मार्ग खात्रीशीर नाही, कर्तबगार लोक देशांतराला तयार होतात कारण उत्तम नागरिक बनण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असते, असे लोक, देशांतर करू लागले तर आपल्या राष्ट्राचा तोटा होता. दुर्बल लोकांनी देशांतर करणे अयोग्य कारण ते स्वतःच्या पायावर जगू शकत नाहीत. [11]

महिलांच्या आर्थिक स्वावलबनाने लोकसंख्या वाढ कमी होईल हा ही उपाय निरूपयोगी असेही मत त्यांनी नोंदविले. कुटुंब लहान ठेवून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवल्याशिवाय भौतिक प्रगती होणार नाही असा स्पष्ट निर्वाळा त्यांनी दिला. प्रत्येक व्यक्तीला भरपूर सुपीक जमीन दिल्याशिवाय भारतीयांना सुबत्ता मिळणार नाही लोकसंख्येला आळा घालावायचा असेल

तर शहाणपणाने कुटुंब नियोजन करणे आणि सर्वसामान्य लोकांना संतती नियमनाबाबत लोकशिक्षण देणे ही काळाची गरज आहे असे स्पष्ट केले. [12]

मुंबई विधानसभेत संतती नियमानाच्या ठरावावर चर्चा झाली. काँग्रेस आणि गांधीवादी सदस्यांनी आत्म संयमनावर भर दिला. आत्मसंयमानाचा मार्ग तकलादु आहे हे श्री भाऊराव गायकवाड यांनी सभागृहाला पटवून दिले. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पक्षाच्या व बाकी आमदाराच्या साहयाने मुंबई विधान मंडळात लोकसंख्या नियंत्रण कायद्याची किती आवश्यकता या देशाला आहे याचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतु तत्कालीन ब्रिटिश सरकार आणि देशातील प्रमुख पक्षांनी या मागणीकडे कधीही गांभीर्याने पाहिले नाही याचे योग्य ती दखल घेतली गेली नाही म्हणून आज संपूर्ण भारतासह जगाला लोकसंख्येचा प्रश्न भेडसावतो आहे. डॉ. आंबेडकरांनी संतती नियमांना संदर्भात जे शास्त्रीय विचार मुंबई विधानसभेत मांडले त्यामुळे महान लोकसंख्या शास्त्री ठरतात.

**संदर्भ -**


1. पोळ अरविंद - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार, सुगावा प्रकाशन, पुणे १९८६, पेज क्रमांक ३०-३१.
2. उपरोक्त - पेज क्रमांक ४५-४६.
3. उपरोक्त - पेज क्रमांक ८२-८३.
4. नरवडे एस एस - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष (1936-1942) निर्मल प्रकाशन नांदेड, जानेवारी 2011, पेज क्र. 122-123.
5. उपरोक्त - पेज क्रमांक 124-125.
6. कुबेर वा ना - डॉ. आंबेडकर विचार मंथन, लोकवाडमय गृह मुंबई, 1982 पेज क्रमांक 162-163
7. उपरोक्त - पेज क्रमांक 82-83.
8. उपरोक्त - पेज क्रमांक 89-90.
9. किर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1977 पेज क्रमांक 206 207
10. कश्यप सुभाष - आवर पार्लमेंट नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली 1995 पेज क्रमांक 172 173
11. मुंबई विधानसभा अहवाल, खंड 4 भाग 2, ऑगस्ट-नोव्हेंबर 1938, पृष्ठ 4024.
12. मुंबई विधानसभा अहवाल खंड 4 भाग 3, ऑक्टोबर-नोव्हेंबर 1938, पृष्ठ 4080.